MHSO100017302022

<u>नि.दि.दा.क्र.४२६/२०२२ मधील निशाणी क्र.४४ खालील आदेश</u>

वादीचे वारसांनी सदरचा अर्ज मयत वादी विठ्ठल लक्ष्मण सुतार याचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे. त्यांनी सदरच्या अर्जात कथन केले आहे की, वादी हा ता.२६.०५.२०२५ रोजी मयत झाला असून त्याला पत्नी शोभा विठ्ठल सुतार व मुले किशोर विठ्ठल सुतार व विनायक विठ्ठल सुतार असे वारस आहेत. त्यामुळे त्यांची नावे दाव्यात वादीचे वारस म्हणुन समाविष्ट करण्यास व त्याबाबत दुरुस्ती करण्यास त्यांनी परवानगी मागितली आहे. म्हणून त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास प्रतिवादींनी जबाब दिलेला असून त्यामध्ये म्हटले आहे की, सदरचे अर्जास त्यांची हरकत असुन सदरचा अर्ज कायदेशीर नाही. वादीचे वारसांना प्रतिवादींविरुध्द दावा चालविण्याचा अधिकार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयांवर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहेः-

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय? | ...होय. |
| २. | आदेश काय? | ..अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ बाबतः–

४. मी वादीचे वारसांतर्फे विद्वान वकील श्री.गायकवाड व प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री.पाटील यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. वादी हा ता.२६.०५.२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. वादीचे वारस वर नमुद केल्याप्रमाणे असल्याचे दिसुन येते. वादीचे वारसांना प्रतिवादींच्या विरुध्द सदरचा दावा चालविण्याचा अधिकार आहे. त्यामुळे वादीच्या वारसांची नावे मयत वादीचे वारस म्हणुन दाव्यात समाविष्ट करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर ''होकारार्थी'' नोंदवित आहे.

### मुद्दा क्र.२ बाबतः–

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

सदरचा निशाणी क्र.४४ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2025.09.26 11:10:17 +0530

दि.२५.०९.२०२५. (सो. द. घनवट)

दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, माळशिरस.

.

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री.म.पां.सदाफुले.

कोर्टाचे नाव – दि. न्या. व. स्तर, माळशिरस.

न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दि.२५.०९.२०२५.

न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दि.२५.०९.२०२५.

न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दि.२५.०९.२०२५.

न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दि.२६.०९.२०२५.

स्वाक्षरीत/–

दि.२६.०९.२०२५. (श्री.म.पां.सदाफुले)

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.